महाराष्ट्र विधानसभा
दिवसाच्या कामकाजाचा क्रम
गुरुवार, दिनांक १९ जुलै, २०१२
(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे -

(अ) सोमवार, दिनांक १६ जुलै, २०१२ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील मा.अध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला श्री.संजय राठोड, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ८४७१३ **"मानोरा (जि.वाशिम) येथील तहसिल कार्यालयासमोर बहुमजली इमारतीचे केलेले अनधिकृत बांधकाम".**

(ब) तारांकित प्रश्न.

दोन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

तीन : विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करणे :-

सर्वश्री. प्रकाश महेता, देवेंद्र फडणवीस, वि.स.स. व श्री.एकनाथराव खडसे (पाटील), मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा यांनी मे.ट्रीटॉप हाऊसिंग ॲण्ड डेव्हलपर्स प्रा.लि.,मुंबई यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण.

चार : समिती प्रमुख, विधानसभा विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव

विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

(१) सन्माननीय विधानसभा सदस्य प्रा.शरद पाटील यांनी श्री.रोहिदास पाटील, माजी विधानसभा सदस्य व माजी संसदीय कार्यमंत्री यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण.

(२) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.बाळा नांदगांवकर यांनी श्री.राहुल शेवाळे, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याकरिता म.वि.स. नियम १८३ (१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

पाच : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).

सहा : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम ९७ अन्वये).

सात : औचित्याचे मुद्दे - (असल्यास).

आठ : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-

(१) **सर्वश्री.एकनाथ शिंदे,** जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, प्रताप सरनाईक, राजन विचारे, रुपेश म्हात्रे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री दौलत दरोडा, कुमार आयलानी, रविंद्र चव्हाण, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"ठाणे महापालिका हद्दीतील शेकडो इमारती धोकादायक असल्याचे महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात आढळल्यामुळे त्यांना तातडीने सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याबाबतची नोटिस पालिका दर पावसाळ्यात बजावत असणे, या भागातील सर्वाधिक धोकादायक इमारती वागळे इस्टेट, नौपाडा, मुंब्रा, माजीवडा, उथळसर, कळवा, वर्तकनगर, कोपरी आणि रायलादेवी आदि भागातील असून सर्व मध्यमवर्गीय कुटुंबे असल्यामुळे त्यांची अन्यत्र निवारा शोधण्याची कुवत नसल्याने पालिकेने नोटिसा बजावल्यानंतरही ही सर्व कुटुंबे धोकादायक घरांनाच टेकू लावून रहात असणे, उपरोक्त भागातील १०१७ धोकादायक इमारतीत राहणाऱ्या सुमारे ८० हजार ठाणेकरांवर ठाण्यातील किसन नगर परिसरातील गणेश भुवन व मुंबईतील लक्ष्मीछाया इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेसारखी घटना होण्याची भीती निर्माण होणे, तसेच २०११ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मा.मुख्यमंत्री महोदयांनी समिती स्थापून १५ दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश देवूनही अद्यापही अहवाल सादर झालेला नसणे, गत वर्षाच्या पावसाळी व हिवाळी अधिवेशनात पाठपुरावा होऊनही अद्यापही कोणतीही कार्यवाही न होणे, याकडे शासनाचे जाणिवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून सदर धोकादायक इमारतींना जादा एफएसआय/ बीएसयुपीद्वारा पुनर्बांधणी करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(२) **सर्वश्री. नवाब मलिक,** जयप्रकाश दांडेगावकर, राजहंस सिंह, मधु चव्हाण, कालिदास कोळंबकर, शशिकांत शिंदे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मुंबई शहर व उपनगरातील म्हाडाच्या विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.३३(७), ३३(९), ३३(५) या अंतर्गत इमारतीचा पुर्नविकास व भाडेकरु गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांच्या उद्‌भवलेल्या विविध समस्या, या समस्या दूर करण्याबाबत म्हाडा तसेच शासनाकडे सभासदांनी अर्ज व विनंत्या करुनसुध्दा त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, बऱ्याच इमारती म्हाडाने पुनर्विकासाच्या नावाखाली पाडणे, तेथील रहिवाशांना भाड्यांच्या खोलीत राहण्यास सांगणे, परंतु विकासकाने भाडे न भरल्याने अनेक कुटुंबे रस्त्यावर येणे, यासंदर्भात म्हाडाचे अधिकारी व महानगरपालिकेचे अधिकारी यांचेकडून भाडेकरुंना पुरेसे सहकार्य न मिळणे, त्यामुळे भाडेकरुंमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, नवीन नियंत्रण नियमावलीत झालेल्या सुधारणा, त्यामुळे भाडेकरुंची व सभासदांची होणारी कुचंबणा, ३ ते ४ वर्षांचा कालावधी उलटूनसुध्दा नियम ३३(९) अंतर्गत हायपॉवर कमिटी नेमूनसुध्दा या कमिटीकडून प्रस्तावास होणारा विलंब, नियम ३३ (५) अंतर्गत म्हाडाचे निश्चित न होणारे धोरण, नियम ३३ (७) व ३३ (९) अंतर्गत भाडेकरुंच्या ७० टक्के हमीपत्राबद्दल पात्रता होण्यास होणारा विलंब, हायकोर्ट व सुप्रीम कोर्टाने आदेश देऊनसुध्दा त्याकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, त्यामुळे भाडेकरु व

सभासदांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. अनिल बावनकर,** विजय वडेट्टीवार, प्रशांत ठाकूर, सुभाष धोटे, विलास तरे, केवलराम काळे, दिलीप माने, भाऊसाहेब कांबळे, रामरतन राऊत, दिनानाथ पडोळे, डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"महाराष्ट्रात क्रीडा क्षेत्राचा दर्जा उंचविण्यासाठी शिव छत्रपती क्रीडापीठ, पुणे अंतर्गत विविध ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी सुरु करण्यात येऊन यात ८ ते १४ वयोगटातील मुला-मुलींची विविध प्रकारच्या चाचण्यांद्वारे निवड केली जात असून ९ चाचण्यांमधून १७ गुण किंवा ८०० मीटर व ३० मीटर धावण्याच्या चाचणीमध्ये ३ पैकी ३ गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची वैद्यकीय चाचणीसाठी निवड करण्यात येणे, या योजनेचा भंडारा जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात करण्यात आल्यानुसार मोठा प्रतिसाद मिळाला असून तुमसर व मोहाडी तालुक्यातील व भंडारा जिल्ह्यातील ८०० मीटर चाचणीमध्ये ३ पैकी ३ गुण मिळणविणारे ६३ विद्यार्थी पात्र ठरविले असताना फक्त ६ विद्यार्थ्यांनाच पत्रे पाठविण्यात येणे तसेच संपूर्ण महाराष्ट्रात ३५० विद्यार्थी पात्र ठरविण्यात येऊनही फक्त ५९ विद्यार्थ्यांनाच पत्रे पाठविण्यात आल्याचे नुकतेच आढळून येणे, यामुळे सन २०१२-१३ मध्ये क्रीडा प्रबोधिनी योजनेमध्ये राज्यातून पात्र ठरविण्यात आलेल्या ३५० विद्यार्थ्यांना वैद्यकीय चाचणीमध्ये पात्र ठरविण्यात येऊन त्यांना क्रीडा प्रबोधिनीमध्ये प्रवेश देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०१२ मध्ये मा.मुख्य मंत्री यांना देण्यात आलेल्या निवेदनानुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

(दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर)

नऊ : **सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक जाधव, सुरेश लाड, मधु चव्हाण, दिपक केसरकर, अमिन पटेल, मानसिंग नाईक, कालिदास कोळंबकर, डॉ.अनिल बोंडे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) :-**

"शासनाने शिक्षण क्षेत्रात मोठी प्रगती केलेली असणे, राज्यात आयएएस व आयपीएस या परिक्षेत राज्यातील बरेच विद्यार्थी उत्तीर्ण होत असणे, राज्यातील मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय स्तुत्य असणे, आर्थिक दुर्बल घटकांना शिक्षण देण्यासाठी काही नियमसुध्दा केलेले असणे, राज्यातील शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देत असताना केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या जाचक अटींमुळे व त्यांच्याकडून निधी वेळेवर मिळत नसल्यामुळे शिक्षणाचा दर्जा राखण्यास असमर्थ असणे, केंद्र शासनाने नुकताच शिक्षण हक्क कायदा (राइट टू एज्युकेशन) संमत केला असून सर्व राज्यांना याची अंमलबजावणी करण्याचे दिलेले निदेश, या कायद्यानुसार राज्यातील अनुदानित व विनाअनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण द्यावे लागणार असणे, प्रत्येक शिक्षण संस्थेत गरीब विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के जागा राखीव ठेवण्याचे शासनाने दिलेले निदेश, परंतु त्यासाठी निधीची व्यवस्था करण्यात आली नसणे, शिक्षण संस्थांना नॉनटिचिंग अनुदान देण्यात न येणे, गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दाखले मिळण्यात होत असलेला विलंब, त्यामुळे या कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या अडचणी, राज्यात सीबीएसई बोर्डाला मिळत असलेली परवानगी, बरेच विद्यार्थी त्याकडे आकृष्ट होणे, निरक्षरांची वाढत असलेली संख्या, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यात येत असलेल्या अडचणी, शासनाकडून शिष्यवृत्ती वेळेवर न मिळणे, त्यामुळे त्यांच्या

शिक्षणावर होत असलेला विपरित परिणाम, वार्षिक १ लाख रु.पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी राजीव गांधी जीवनदायी योजना शासनाने सुरु केली असणे, त्याचे नियम जाचक असल्यामुळे त्याचा फायदा गरीब कुटुंबाला मिळत नसणे, राज्यातील खाजगी मोठ्या रुग्णालयात गरीबांसाठी ५ टक्के खाटा राखीव ठेवण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, परंतु याची अंमलबजावणी करण्यास खाजगी मोठ्या रुग्णालयांनी विरोध केल्यामुळे या योजनेची अंमलबजावणी सुध्दा न होणे, त्यामुळे नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, सर्व शिक्षा अभियान योजनेचा तसेच गोरगरीबांना राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ देण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

दहा : सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील), सुभाष देसाई, बाळा नांदगांवकर, गणपतराव देशमुख, सुधीर मुनगंटीवार, गिरीष बापट, गिरीष महाजन, रविंद्र वायकर, देवेंद्र फडणवीस, श्रीमती मिनाक्षी पाटील, सर्वश्री नितीन सरदेसाई, विनोद घोसाळकर, विवेक पाटील, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-

"राज्यातील सिंचन क्षमतेबाबत राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात गत १० वर्षात ७० हजार कोटी रुपये खर्च करुन केवळ ०.१ टक्के सिंचनात वाढ झाल्याचे नमूद करण्यात येणे, मा.मुख्यमंत्र्यांनी त्याबाबत माहे मे, २०१२ मध्ये श्वेतपत्रिका काढण्याचे जाहीर करुनही अद्यापपर्यंत श्वेतपत्रिका काढण्यात न येणे, जलसंपदा विभागातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारामुळे सिंचनामध्ये वाढ न झाल्याचे दिसून आल्यानंतर त्याबाबत राज्य मंत्रिमंडळातील संबंधित मंत्र्यांमध्ये तसेच मंत्रिमंडळाच्या बैठकीतही त्याबाबत वाद निर्माण होणे, सिंचन क्षेत्रात झालेली वाढ कृषि विभागाने ०.१ टक्के इतकी असल्याचे आणि जलसंपदा विभागाने ५.२५ टक्के इतकी असल्याचे जाहीर केल्यामुळे त्याबाबत मोठे वाद निर्माण होणे, सिंचनावर काढण्यात येणाऱ्या श्वेतपत्रिकेसंदर्भात दिनांक ३ जुलै, २०१२ रोजी मंत्रिमंडळाच्या खास बैठकीमध्ये झालेल्या सादरीकरण व कागदपत्रांवरुन मा.मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेनुसार श्वेतपत्रिका काढण्याबाबत निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, सिंचनावर हजारो कोटी रुपयांचा खर्च करुनही सिंचनात अपेक्षित वाढ न झाल्यामुळे जलसंपदा विभागातील भ्रष्टाचार व गैरकारभार आणि कृषि विभागाचे त्याबाबतचे स्पष्टीकरण तसेच मंत्रीमंडळातील मतभेदांवर शासनाची भूमिका स्पष्ट होऊन त्याबाबतची सत्यता जनतेसमोर येण्यासाठी श्वेतपत्रिका काढण्याची आवश्यकता तसेच राज्यावर सातत्याने वाढत असलेले कर्ज सुमारे २ लाख २८ हजार कोटीपर्यंत गेले असून त्या तुलनेमध्ये शासनाकडून राज्याच्या सर्वांगिण विकासासाठी त्याचा विनियोग कशा प्रकारे झाला याबाबत राज्याच्या जनतेमध्ये संभ्रम असल्याने राज्याच्या आर्थिक परिस्थितीचीदेखील श्वेतपत्रिका काढण्याची गरज, या दोन्हीही श्वेतपत्रिका तातडीने काढण्याची आवश्यकता असतानाही शासनाकडून हेतूपुर:स्सरपणे त्याबाबत होत असलेला विलंब, त्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, त्याबाबत शासनाने तातडीने श्वेतपत्रिका काढण्याबाबत करावयाची कार्यवाही."

अकरा : शासकीय विधेयके -

(१) पुर:स्थापनार्थ,

सन २०१२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जमिन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१२.

(२) विचार, खंडश: विचार व संमत करणे.

(क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील), महादेव बाबर,सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, विनोद घोसाळकर, सुभाष देसाई, विवेक पंडित, सुरेश हाळवणकर, शिशिर शिंदे, नितीन भोसले, मंगेश सांगळे, बाळा नांदगांवकर, प्रविण दरेकर, विवेक पाटील, श्रीमती मिनाक्षी पाटील, श्री.धैर्यशील पाटील, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री नानाजी शामकुळे, अबू आजमी, भरतशेठ गोगावले, सुर्यकांत दळवी, राजन साळवी, सदानंद चव्हाण, प्रताप सरनाईक, एकनाथ शिंदे, रुपेश म्हात्रे, राजन विचारे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चंद्रकांत मोकाटे, विजय शिवतारे, अनिल राठोड, रविंद्र वायकर, प्रकाश (बाळा) सावंत, राजेश क्षीरसागर, चंद्रदिप नरके, श्रीमती मिराताई रेंगे पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१२ चा अध्यादेश क्रमांक ६ - मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) अध्यादेश, २०१२ नापसंत करते."

(ख) **सन २०१२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०१२.**

---

(३) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश : विचार व संमत करणे-

(क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री देवेंद्र फडणवीस, महादेव बाबर, एकनाथराव खडसे (पाटील), सुधीर मुनगंटीवार, विनोद घोसाळकर, सुभाष देसाई, विवेक पंडित, विवेक पाटील, श्रीमती मीनाक्षी पाटील, सर्वश्री धैर्यशील पाटील, सुरेश हाळवणकर, शिशिर शिंदे, नितीन भोसले, मंगेश सांगळे, बाळा नांदगांवकर, प्रविण दरेकर, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री नानाजी शामकुळे, भरतशेठ गोगावले, सुर्यकांत दळवी, राजन साळवी, सदानंद चव्हाण, प्रताप सरनाईक, एकनाथ शिंदे, रुपेश म्हात्रे, राजन विचारे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चंद्रकांत मोकाटे, विजय शिवतारे, अनिल राठोड, रविंद्र वायकर, प्रकाश (बाळा) सावंत, राजेश क्षीरसागर, चंद्रदिप नरके, श्रीमती मिराताई रेंगे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१२ चा अध्यादेश क्रमांक ५ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१२ नापसंत करते."

(ख) **सन २०१२ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१२.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. महादेव बाबर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१२ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१२. विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१२ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१२. विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(४) विचार, खंडश: विचार व संमत करणे.

(क) **सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, दादाराव केचे, प्रा.अतुल देशकर, सर्वश्री विजयकुमार देशमुख, संजय राठोड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री देवेंद्र फडणवीस, सुधाकर देशमुख, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, सुधीर पारवे, विजय घोडमारे,महादेव बाबर वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री विजय औटी, अनिल राठोड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री गिरीष बापट, भिमराव तापकीर, संजय भेगडे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३०९ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राजेश क्षीरसागर, चंद्रदीप नरके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. प्रकाश (बाळा) सावंत, प्रा.शरद पाटील, सर्वश्री सुरेशदादा जैन, सुभाष देसाई, आर.एम.वाणी, चिमणराव पाटील, संतोष सांबरे, ओमप्रकाश भुपालसिंह उर्फ पवनराजे निंबाळकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ण) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री बबनराव घोलप, धनराज महाले, अनिल कदम, दादाजी भुसे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(त) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत ॲड.आशिष जयस्वाल, सर्वश्री विजयराज शिंदे, रुपेश म्हात्रे, विवेक पंडित, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ९१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(थ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत, सर्वश्री सुर्यकांत दळवी, राजन साळवी, सदानंद चव्हाण, भरतशेठ गोगावले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ८१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(द) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय (बंडू) जाधव, श्रीमती मीरा रेंगे-**

पाटील, सर्वश्री संजय शिरसाठ, अशोक काळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ध) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.संजय रायमुलकर, सर्वश्री अशोक शिंदे, नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(न) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पाटील, श्रीमती मीनाक्षी पाटील, श्री.धैर्यशील पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(५) (क) **सन २०१२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र जमिन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१२.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, गिरीष महाजन, दादाराव केचे, प्रा.अतुल देशकर, सर्वश्री विजयकुमार देशमुख, संजय राठोड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र जमिन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री देवेंद्र फडणवीस, सुधाकर देशमुख, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र जमिन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. महादेव बाबर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र जमिन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या

३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सुभाष देसाई, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र जमिन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

बारा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

(मंगळवार, दिनांक १७ जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना)

(१) श्री.प्रकाश मेहता, वि.स.स.

"घाटकोपर (पूर्व) मुंबई येथे सर्व्हे क्र.२३६ 'अ' मध्ये आरक्षित शासकीय रुग्णालय, तालुका क्रिडा संकुल, स्मशानभुमीच्या कामाबाबत" या विषयावरील श्री.प्रकाश महेता, वि.स.स. यांचा दिनांक २७ मार्च, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३३९ मधील प्रश्न क्रमांक ५५३२२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(गत सत्रातील प्रलंबित अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक २ ते ४)

(२) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

" राज्यातील सुमारे २० जिल्ह्यांमध्ये प्रकर्षाने आढळणाऱ्या सिकलसेल या गंभीर आजारावर प्रतिबंध घालण्याच्या दृष्टिने प्रभावी उपाययोजनांचा असलेला अभाव, परिणामी सिकलसेलचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढणे, धोक्यात आलेले नागरिकांचे आरोग्य, शासनाचे याकडे होणारे दुर्लक्ष, यासंदर्भात प्रभावी उपाययोजना होण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

(३) श्री.संजय भेगडे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

" महात्मा ज्योतीबा फुले यांच्या वारसदारांना पोटापाण्यासाठी वणवण भटकावे लागणे, त्यांचे पुत्र यशवंतराव फुले यांची कन्या लक्ष्मीबाई होले यांचे पुत्र दत्रात्तय होले हे महात्मा ज्योतीबा फुलेंचे वंशज असणे, महात्मा फुलेंचे हे वंशज आपल्या अधिकारासाठी सतत संघर्ष करीत असणे, महात्मा ज्योतीबा फुले यांनी आपल्या दिनांक १० जुलै, १९८७ च्या मृत्युपत्रात नमूद केल्याप्रमाणे या वारसदारांना अधिकार मिळावेत अशी वारसदारांची मागणी असणे, प्रसिध्द साहित्यिक हरी नरके यांनी सन १९९३ मध्ये व श्री.बाबा आढाव यांनी सन १९९७ मध्ये महात्मा फुले यांच्या वंशाबाबत माहिती प्रसिध्द करणे, या वारसदारांच्या मागण्यांकडे १८ वर्षांपासून समाज कल्याण विभागाने दुर्लक्ष करणे, त्यामुळे सदर वंशज हलाखीचे जीवन जगत असणे, महात्मा फुलेंनी पुण्यातील भिडेवाड्यामध्ये सुरु केलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेची प्रचंड दुरावस्था होणे, सदर शाळा पुन्हा सुरु करण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे

होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

(४) **श्री.सुधीर मुनगंटीवार,** वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यातील पंढरपूर-देहू-आळंदी ही तीर्थक्षेत्रे मोठी ऊर्जा देणारी प्रेरणादायी शक्तीस्थळे असणे, या तीर्थक्षेत्रांना भेट देताना भाविक पर्यटकांनी वर्षभरात सुमारे साडे पाच हजार कोटी रुपये खर्च करणे, याचा लाभ राज्याला व देशाला होणे, या ठिकाणी पर्यटन प्रकल्प राबविताना तो व्यवस्थित कार्यान्वित न झाल्याने भाविक पर्यटकांना चांगल्या सोयी सुविधा न मिळणे, तीर्थक्षेत्रांच्या या पर्यटन प्रकल्पामुळे सन १९६७ पासून स्थानिकांवर मोठया प्रमाणावर अन्याय होणे, त्यामुळे पर्यटक भाविकांना व स्थानिकांना समस्यांचा सामना करावा लागणे, राज्य शासनाच्या माहे जून, १९९३ च्या अधिसूचनेप्रमाणे आणि केंद्र शासनाने सन २००३ पासून पुरस्कृत केलेल्या या तीर्थक्षेत्रांच्या पर्यटन प्रकल्पाचे सुधारीत नाव विशेष विकास पंढरपूर-देहू-आळंदी मंडळ असे करण्याची नितांत आवश्यकता, त्याचप्रमाणे या प्रकल्पाचा उद्देश तीर्थक्षेत्र विकासाचा असल्याने तो स्पष्टपणे परिभाषित करुन कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता, या पर्यटन प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या बाधित परिवारांना प्रकल्पग्रस्त म्हणून लाभ मिळण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(दिनांक १२ जुलै, २०११२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना क्र.४ व ५)

(५) **श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपुरातील मिहान प्रकल्पग्रस्तांना देवू केलेल्या १२.५% विकसीत जमीन व अनुदानासाठी शासनाने जाचक अटी लादल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये नाराजी निर्माण झाली असणे, १२.५% विकसीत जमीन देताना प्रकल्पग्रस्तांकडून संपूर्ण जागेची रक्कम वसूल करण्यात येवूनही ३०% जमीन वगळून देण्यात येणार असणे, भूखंड हस्तांतरण करताना ३०० रु./चौ.मी. आकारण्याची अट टाकलेली असणे, सानुग्रह अनुदान देताना १२/२ च्या नोटीस मधील प्रकल्पग्रस्तांना मिळालेली संपूर्ण रक्कम न आकारता निव्वळ अवार्ड घोषित रक्कमच घेण्याबाबत आदेश काढण्याची गरज असणे, भूखंड हस्तांतरणास वेळेचे निर्बंध हटविण्याची गरज असणे, मौजा जयताळा येथील १४३ हेक्टर जमिनीसंदर्भात प्रकल्पग्रस्तांनी स्वत:हून ॲग्रीमेंट करुनही अद्यापपावेतो मोबदला देण्यात न आल्याने तातडीने मोबदला देण्याची आवश्यकता असणे, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी वाढीव मोबदल्यासाठी दाखल केलेल्या केसेसेच्या निपटाऱ्यासाठी स्थापित फास्ट ट्रॅक कोर्टाला मा.न्यायालयाच्या विनंतीनुसार तात्पुरत्या स्वरुपात इतरत्र स्वतंत्र जागा देण्याची आवश्यकता असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

(६) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"चंद्रपूर जिल्ह्यातील हुमन नदी प्रकल्प हा सिंदेवाही तालुक्यातील सिरकाडा येथील

हुमन नदीवर प्रस्तावित प्रकल्प असणे, या प्रकल्पाच्या नेट प्रेझेंट व्हॅल्युपोटी १७० कोटी रु. निधीला राज्य मंत्रीमंडळाने मान्यता देणे, या निधीला मा. राज्यपालांच्या निदेशातून सूटही देण्यात येणे, मात्र या प्रकल्पाच्या नेट प्रेझेंट व्हॅल्युच्या रकमेत वाढ झाल्यामुळे या प्रकल्पाच्या वाटचालीत अडसर निर्माण होणे, हुमन नदी प्रकल्पाच्या एन.पी.व्ही.चे ८३.२२ कोटी रुपये तातडीने भरण्याची आवश्यकता असणे, हा प्रकल्प माजी मुख्यमंत्री कर्मवीर मा.सा. कन्नमवार यांच्या कर्मभूमीतला सिंचन प्रकल्प असणे, प्रकल्पासाठी आवश्यक असलेली नेट प्रेझेंट व्हॅल्यु एकरकमी भरण्यासंदर्भात शासनाचे दुर्लक्ष होणे, या सिंचन प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील बहुतांश गावे आदिवासी बहुल असणे, हा प्रकल्प जिल्ह्यातील मूल, पोंभुर्णा, सिंदेवाही, बल्लारपूर या तालुक्यांच्या सिंचनाच्या दृष्टीने वरदान ठरणार असल्यामुळे तसेच चंद्रपूर शहराच्या पाणी पुरवठ्याच्या प्रश्नावरही या प्रकल्पामुळे तोडगा निघणार असल्यामुळे या प्रकल्पाच्या एन.पी.व्ही. चे ८३.२२ कोटी रु. तातडीने भरुन या प्रकल्पाच्या वाटचालीतील अडसर दूर करण्याची आवश्यकता असणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

(खालील अर्धा-तास चर्चेच्या सूचना बॅलटद्वारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आल्या आहेत.) (सूचना क्र.६ व ७)

(७) **श्री. सुधीर मुनगंटीवार,** वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

" राज्याचे माजी मुख्यमंत्री कै.कन्नमवार यांच्या १११ व्या जयंती दिनानिमित्त त्यांची कर्मभूमी असलेल्या मूल (जि.चंद्रपूर) येथे ५ कोटी रु.खर्चून त्यांचे भव्य स्मारक उभारण्याची घोषणा मा.वित्तमंत्र्यांनी सन २०१० चा अर्थसंकल्प सादर करताना करणे, परंतु अद्यापही सदर स्मारक उभारण्याच्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही न होणे, स्मारकासाठी जागेचा प्रश्न अद्याप निकाली न निघणे, शासनाने स्मारकासाठी कोणतीही आर्थिक तरतूद न करणे, कै.कन्नमवारांचे राज्याच्या विकासातील बहुमूल्य योगदान लक्षात घेता त्यांचे स्मारक मूल येथे उभारण्याबाबत तातडीने कार्यवाही होण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **श्री. गिरीष बापट,** वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"पुणे शहरासाठी तत्कालीन परिवहन राज्यमंत्र्यांनी पूर्व भागात आर.टी.ओ. कार्यालयाची स्थापना करण्याची घोषणा होऊनही ५ वर्षात अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे, पुणे आर.टी.ओ. कार्यालयामार्फत शासनाकडे ५०० कोटींचा महसूल देण्यात येणे, परंतु अनेक सोयीसुविधांचा अभाव असल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, कार्यालयाचे विस्तारीकरण व नवीन सोयीसुविधांसाठी मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्फत ३२ कोटी रुपयांचा आधुनिकीकरणाचा प्रस्ताव शासन स्तरावर मंजुरीसाठी प्रलंबित असणे, कार्यालयाचे काम आयएसओ ९००२ ह्या मानकाप्रमाणे करण्याची गरज असणे, पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात सर्व प्रकारच्या सुमारे २० लाख वाहनांची नोंद असणे, तसेच शिकाऊ वाहन परवाना, नूतनीकरण, खटले लायसन्स, खाजगी खटले इ. अनेक विभाग कार्यरत असणे, आर.टी.ओ. कार्यालयाला शहरात बावधान, महमंदवाडी येथे पुणे विकास

आराखडयातील व शहरातील ७ ठिकाणी लर्निंग लायसन्सच्या टेस्टसाठी पुणे महानगर पालिका कार्यक्षेत्रातील ॲमिनिटी स्पेस मागण्यात येऊनही अद्यापही जागा न मिळणे, परिणामी शिकाऊ अनुज्ञप्ती टेस्टींगच्या कामात अडचणी निर्माण होणे, प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे विभागीकरण करण्याकरीता लोकप्रतिनिधींनी वारंवार पत्रव्यवहार करुनही कारवाई न होणे, कर्मचाऱ्यांचे अपुरे मनुष्यबळ, आर.टी.ओ. च्या कामकाजासाठी सन १९६६ पासून सुरु असलेली संगणक प्रणाली जुनी झाल्याने वारंवार बंद पडणे, सदर प्रणाली निष्क्रीय संगणक कालबाह्य झाल्याने वारंवार नादुरुस्त होणे, वायरिंग व इतर कारणांमुळे संगणक प्रणाली बंद पडल्याने सर्व कार्यालयीन कामकाज बंद पडणे, परिणामी सर्व कामकाज महिना-दोन महिन्यांपासून ४-५ दिवस बंद असणे, एजंट, मध्यस्थी व दलालांचे कर्मचारी व अधिकारी यांच्या सहकार्याने कार्यरत असलेली पर्यायी प्रभावी सेवा, आर्थिक अनियमिततेसंदर्भात मोठया प्रमाणावर असलेल्या नागरिक व विविध संघटनांच्या तक्रारी, रिक्षा परवाने हस्तांतरीकरणास विलंब होत असणे, रिक्षा चालकांचे परवाने, हस्तांतरण, नूतनीकरण व इलेक्ट्रॉनिक मीटर अशा कार्यालयातील विविध समस्या असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १८ जुलै, २०१२.

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.